पुण्य नगरी

# आरोग्यजागर

। उत्तम आरोग्य । उज्ज्वल भविष्य । पुणे, मंगळवार,२८ एप्रिल २०१५





# हृदयविकाराच्या झटक्यावर देखील होमिओपॅथीद्वारा तत्काळ उपचार






Myocardial Infarct म्हणजे हृदयविकाराचा झटका. हृदयामुळे संपूर्ण शरिरात रक्ताभिसरण व्यवस्थित होते. याच हृदयाला रक्तपुरवठा करणारी दोन महत्त्वाची उजवी व डावी रक्तवाहिनी असते. डाव्या रक्तवाहिन्यांच्या आणखी दोन उपशाखा होतात.

Left Anterior Discending आणि Left Circumflex artery जेव्हा हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये रक्त प्रवाहात अडथळे येतात. त्यावेळी हृदयाला रक्त पुरवठा विस्कळीत होऊन कमी होऊ शकतो. त्याला आपण हृदयविकाराचा तीव्र झटका असे समजतो. त्याचे प्रमुख लक्षणे म्हणजे छातीत तीव्र वेदना होतात, अस्वस्थ वाटू लागते. खांदे, हात, मान, पाठ, जबडा यामध्ये वेदना निर्माण होऊन जकडल्यासारखे जाणवते. या वेदना काही मिनिटे राहू शकतात किंवा वरचेवर होऊ शकतात. त्याचबरोबर काही रुग्णांमध्ये छातीत जळजळ देखील होऊ शकते. त्याचबरोबर मळमळ, चक्कर येणे, गरगरणे, अपुरा श्वास, दम लागणे, थंड व प्रचंड प्रमाणात घाम सुटणे, अतिशय थकवा येणे, ही लक्षणे जाणवतात.

मधुमेहाच्या पेशंटमध्ये वरील लक्षणे व संवेदनामुळे कुठलीही वेदना नसताना देखील तीव्र स्वरूपाचा झटका येवून तत्काळ हृदय बंद पडू शकते.

हृदयाला रक्तपुरवठा कमी होणे अथवा बंद पडणे. हृदयातील रक्तवाहिन्यांच्या अडथळ्यामुळेच होऊ शकते याची प्रमुख कारणे -

१) उच्च रक्तदाब २) सिगारेट ३) मधुमेह ४) व्यायामाचा अभाव ५) चरबीयुक्त आहार अथवा निकृष्ट आहार ६) अतिमद्यपान.

वरील कारणामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यात घट्ट चरबीचे थर जमतात. यालाच Atherosclerosis असे म्हणतात. हे थर रक्तवाहिन्यात हळूहळू वाढत जावून संपूर्ण रक्तवाहिन्या बंद पडू शकतात. जसे जसे रक्तवाहिन्याअंतर्गत चरबीचे थर जमतात. तसा तसा हृदयाला होणारा रक्तपुरवठा कमी कमी होत जातो. दरम्यान, दम लागणे, छातीत दुखणे ही लक्षणे जाणवतात. अशावेळी रुग्णांनी सावध होऊन योग्य वेळी वैद्यकीय उपचार घेतल्यास ही प्रक्रिया मंदावू शकते अथवा थांबू शकते. क्वचित प्रसंगी हृदयाच्या रक्तवाहिन्यांत तीव्र स्वरूपाचे आकुंचन निर्माण होवून रक्तवाहिन्यांमधील रक्तप्रवाहात अडथळा होऊन हृदय तत्काळ बंद पडू शकते.

**Heart Attack चे निदान**

E.C.G द्वारा, रक्ताच्या तपासणीद्वारा, Angiography द्वारा तसेच 2 D Echo द्वारा व Cartography द्वारा केले जाते, वरचेवर रक्तदाब तपासणे, चरबीयुक्त आहार टाळणे व नियमित व्यायाम करणे. साखर, मीठ , तेल यांचे सेवन कमीत कमी करणे, कोणतेही औषध मनाने न खाता डॉक्टराच्या सल्ल्याने औषधोपचाराने विकार काबूत ठेवता येतो. काही रुग्णांमध्ये हा आजार अनुवंशिक स्वरूपात आढळतो.

**केस -**

ही एका ६९ वयाच्या वयोवृद्धाची केस आहे. ज्याची २ वेळा बायपास सर्जरी झाली होती आणि पुन्हा तिसऱ्यांदा हृदयाच्या रक्तवाहिन्या गंभीर स्वरूपाचे अडथळे निर्माण होवून पुन्हा हृदयाच्या बराचश्या भागाला रक्तपुरवठा अत्यंत कमी प्रमाणात होता. हे त्याच्या रिपोर्टवरून निदर्शनास आले. पुन्हा सर्जरी करणे शक्य नसल्याने त्याचे रिपोर्ट्स घेऊन तो माझ्याकडे आला होता.

त्याच दिवशी ताबडतोब दुपारी नेहमीप्रमाणे मी असिस्टंट डॉक्टरांना त्याची माहिती घेण्यास सांगितली. एक-दोन तास झाले मी माझ्या कामात व्यस्त होतो. तितक्यात मला फोन आला की पेशंटच्या छातीत तीव्र वेदना होऊन श्वास कोंडल्यासारखे वाटत आहे व पेशंट थांबायला तयार नाही. तोपर्यंत असिस्टंट डॉक्टराने केस लिहून पूर्ण केली होती. हृदयविकार ही एक अशी तत्काळ अत्यावश्यक सेवा आहे. त्यात तातडीने उपचार न झाल्यास तत्काळ मृत्यू येऊ शकतो. मी त्या रुग्णाकडे क्षणभर पाहिले आणि त्याचा केसपेपर झटकन वाचला. त्यात मला योग्य औषध निवडण्याच्या दृष्टीने काही उल्लेखनीय लक्षणे आढळली आणि मी तत्काळ त्या होमिओपॅथीक औषधाचा वापर केला आणि त्याला विश्रांती घेण्यासाठी सल्ला दिला. ती वेळ मोठी गंभीर आणि धोकादायक होती. मी असिस्टंट डॉक्टरला त्याच्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले आणि औषधाचा डोस रिपीट करण्यास सांगितले. दुसरा पेशंट पाहण्यासाठी पुन्हा मी व्यस्त झालो. साधारण ४ ते ५ मिनिटे गेल्यावर तो घाबरलेल्या अस्वस्थ झालेला पेशंट हसत हसत माझ्यासमोर उभा राहिला. आणि म्हणाला माझ्या वेदना पूर्ण थांबल्या आहेत. श्वास सुरळीत झाला आहे. आता मी तुम्ही म्हणाल तितक्या वेळ थांबायला तयार आहे.

**तक्रारी -**

**१) छातीत दुखणे ८ महिन्यांपासून**
**- रात्री ४ ते ६ च्या दरम्यान, अतिश्रमानंतर आणि उष्ण हवामानात लक्षणांमध्ये वृद्धी**
**- छातीत दुखल्यानंतर झोपल्यावर व गार हवेत बरे वाटणे.**
**२) बद्धकोष्ठता चाळीस वर्षांपासून.**
**- पडसाकडला कठीण होणे व जोर द्यावा लागणे.**
**- वारंवार लघवीला आल्यासारखी वाटणे.**
**३) गुडघेदुखी २ वर्षांपासून.**
**- जीना चढताना, उतरताना व चालताना गुडघे दुखणे.**
**४) कंबरदुखी एक महिन्यापासून.**
**- कमरेत वाकल्यामुळे त्रास**
**- सरळ बसल्यावर बरे वाटणे**
**५) डोळ्यांमध्ये, डोक्यात व पोटात आग होणे.**
**६) उष्ण हवामानात, उन्हाळ्यात त्रास वाढणे.**
**७) थंडाव्यामुळे बरे वाटणे.**

**व्यक्तीमत्व -**

**१) जेवणामध्ये गोड व फळांची आवड.**
**२) स्निग्धपदार्थ नावड**
**३) घामास दुर्गंधी**
**४) लहानपणापासून व या वयात देखील हस्तमैथूनाची सवय**
**५) पाण्याची व निसर्ग पर्यटनाची स्वप्ने**
**६) प्रकृती - उष्ण**

**स्वभाव -**

**१) तुमचा स्वभाव कसा आहे ?**

- माझा स्वभाव रागीष्ट आहे. एकाच गोष्टीची पुनरावृत्ती केली की मला राग येतो. माझ्या बोलण्याकडे लक्ष नाही दिले तरी मला राग येतो. विचित्र प्रश्न विचारले तरी मला राग येतो. मी एक डॉक्टर आहे आणि पेशंटला सांगितलेली पथ्य पाळली नाही की मला राग येतो. राग आला की मी त्यांना हाकलून देतो.

**२) तुमचे लहाणपण कसे गेले?**

- मला पक्षी निरीक्षण, गिर्यारोहण व जंगलात भटकण्याची खूप आवड आहे. पाण्यांच्या लहरींच्या आवाजामुळे मी मंत्रमुग्ध होतो.

**३) तुमचे वैवाहिक जीवन कसे आहे?**

- बायकोशी पटत नसल्यामुळे मी वैवाहिक जीवनात असमाधानी आहे. त्यामुळे मला हस्तमैथूनची सवय लागली आहे. सध्याही माझी लैंगिक इच्छा प्रबळ आहे. मला एकटेपणा जास्त आवडतो. गर्दीच्या ठिकाणी माझी चिडचिड वाढते.

विशेष माहिती -

**१) रात्रीच्या वेळी ४ ते ६ च्या दरम्यान छातीत दुखणे.**
**२) बद्धकोष्ठता.**
**३) गोड व फळांची आवड**
**४) तहान जास्त**
**५) उष्ण हवामानात व उन्हाळ्यात त्रास वाढणे.**
**६) ठराविक मुदतीने लक्षणांमध्ये पुनरावृत्ती.**
**७) ताठ बसल्यावर बरे वाटणे**
**८) हस्तमैथूनाची सवय**
**९) निर्लज्जपणा**
**१०) एकटेपणची आवड**
**११) प्रकृती - उष्ण**

ह्या लक्षणांनुसार होमिओपॅथिक औषध सुरू केले, त्याचे छातीत दुखणे तर ३ मिनिटांत बरे झाले. काही दिवसांत त्याचा दम लागणे संपूर्णपणे बरे झाले. बद्धकोष्ठता दूर झाली व तो शांत झोपू लागला.

चार वर्ष झाले तो कुठल्याही शस्त्रक्रियेशिवाय चांगले आयुष्य जगत आहे. यावरून लक्षात येते की गंभीर आणि इमर्जन्सी केसेसमध्ये सुद्धा होमिओपॅथी विलक्षण वेगात काम करते व रुग्णांना जीवदान देते.

■ **पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

# ‘एमईएस’ ने दिला २९१३ मातांना प्रसुतीसाठी आधार

## ७८ हजार ५०३ मातांना प्रसुतीदरम्यान तातडीचे वैद्यकीय उपचार

**। पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेडिकल इमर्जन्सी सर्व्हिसेस (एमईएस) च्या डायल १०८ या रूग्णवाहिका सेवा आपत्कालीन रूग्णवाहिकेमध्ये यावर्षी मार्च अखेर २९१३ मातांची प्रसुती करण्यात आली आहेत तर ७८५०३ महिलांना प्रसुति दरम्यानची तातडीची वैद्यकिय सेवा देण्यात आली. यावर्षी मार्च २०१५ अखेर दोन लाख ६८ हजार ४९७ जणांना अत्याधुनिक रुग्णवाहिका सेवेचा लाभ मिळाला आहे.

राज्य शासनाच्या आरोग्य विभाग आणि बीव्हीजी इंडिया लिमिटेड या सेवा क्षेत्रातील कंपनीच्या माध्यमातून ही सेवा चालविण्यात येते. प्रसुतीच्या दरम्यान १०८ हा टोल फ्री क्रमांक डायल केल्यानंतर महाराष्ट्र इमर्जन्सी मेडीकल सर्व्हिसह्यच्या सुसज्ज रुग्णवाहिका मदतीला येतात. पुण्यातील औंध उरो रुग्णालयात या सेवेचे प्रमुख केंद्र व प्रतिसाद केंद्र आहे. या सेवेमुळे राज्यातील मातांना खुप मोठा आधार मिळत आहे. केवळ प्रसुतीदरम्यानच्या मातांनाच नव्हे तर अपघातग्रस्तांसाठीही ही सेवा उपयुक्त ठरत आहे.

आतापर्यंत ८२१ रुग्णांना रूग्णवाहिकेतील अत्याधुनिक व्हेंटीलेटर सुविधेच्या मदतीने रूग्णालयात दाखल करण्यात आले तर डिफिब्रिलेटरच्या मदतीने ९२ रूग्णांना सेवा देण्यात आली. आरोग्य विभागाच्या आपत्कालीन वैद्यकिय सेवा प्रकल्पांतर्गत सुरू करण्यात आलेल्या १०८ टोल फ्री रूग्णवाहिका सेवेमुळे मार्च २०१५ पर्यंतच्या कालावधीत दोन लाख ६८ हजार ४९७ लोकांचे जीव वाचले आहेत, अशी माहिती बीव्हीजी इंडियाचे अध्यक्ष एच. आर. गायकवाड यांनी दिली. या अत्याधुनिक वैद्यकीय सेवेसाठी १०८ ह्य या दूरध्वनी क्रमांकावर डायल केल्यास विनामूल्य सेवा देणारी सुसज्ज रुग्णवाहिका डॉक्टरांसह येते. यामध्ये अपघात, हृदयविकार, भोवळ येणे, अर्धांगवायू, विषबाधा, आगीत भाजणे अशा अनेक प्रकारच्या आपत्कालीन स्थितीमध्ये ही रुग्णवाहिका बोलावता येते, अशी माहिती एमईएस सर्व्हिसचे मुख्य संचालन अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांनी दिली.

# स्वाईन फ्लू रुग्णांची संख्या घटली




**। पुणे : प्रतिनिधी**

स्वाईन फ्लु रूग्णांचा रूग्णालयातील ओघ ओसरला असून शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये एकुण आठ स्वाईन फ्लुचे रूग्ण उपचार घेत आहेत. त्यापैकी चार रुग्ण हे व्हेंटिलेटरवर तर उरलेले चौघे जनरल वॉर्डमध्ये उपचार घेत आहेत, अशी माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली.

यावर्षी जानेवारीपासून २७ एप्रिलपर्यंत ८०६ रूग्ण स्वाईन फ्लुसाठी पॉझिटिव्ह सापडले असुन त्यापैकी ८६ जणांचा मृत्यु झाला आहे आणि ७१३ जणांना रूग्णालयातुन डिस्चार्ज देण्यात आला आहे.

याच कालावधीत एक लाख ६७ हजार ४९७ रूग्णांचे स्क्रीनिंग केले आहे तर १८२६८ जणांना टॅमिफ्लु औषध देण्यात आले आहे. यापैकी आज १७२७ जणांचे स्क्रीनिंग केले असून ३३ संशयित असलेल्या रूग्णांना टॅमिफ्लुच्या गोळ्या देण्यात आल्या. तसेच जानेवारीपासून आतापर्यंत २४७३ जणांचे स्वॅब आतापर्यंत तपासणी करण्यासाठी पाठवण्यात आल्याची माहिती पुणे महानगरपालिकेच्या अरोग्य विभागाने दिली.




# किरकोळ कारणावरून मारहाण; चौघांना अटक

**। पुणे : प्रतिनिधी**

किरकोळ कारणावरून भांडण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी चार आरोपींना अटक केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी संजीव सरदार यांनी आरोपींना ३० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अमोल काळूराम भोर (वय २६, रा. वाडेबोल्हाई), केतन रामदास कोलते (वय २१), विशाल रामदास कोलते ( वय २२) व मयुर संपत जाधव (वय १९) तिघेही रा. बकोरी अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी सुनील रामचंद्र गावडे (वय ३५, रा. वाडेबोल्हाई) यांनी फिर्याद दिली आहे. २४ एप्रिल रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास वाडेबोल्हाई रस्त्यावरील हॉटेल शिवराज येथे जेवण करत होते. यावेळी फिर्यादी सुनील गावडे याने आरोपी अमोल यास, ‘तू माझे दोन वर्षांपूर्वी घेतलेले पैसे कधी देणार’ असे विचारले. या कारणावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर आरोपींनी त्यांच्याकडील स्कॉर्पिओ (एम.एच. १२ - ३६८५) गाडी गावडे यांना आडवी घातली. आरोपींनी हॉकी स्टीकने गावडे मारहाण करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

# पीएमपीसाठी पूर्ण वेळ अधिकारी नेमावा

**। पुणे** : डॉ. श्रीकर परदेशी यांच्या बदलीनंतर पुणे परिवहन मंडळाच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकपद अद्याप पुर्ण वेळ अधिकारी नियुक्त करण्यात आलेला नाही. त्यामुळे याठिकाणी पुर्ण वेळ अधिकाऱ्याची नियुक्त करण्याची मागणी शहरातील विविध स्वयंसेवी संस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

पुर्णवेळ अधिकारी निवडल्यास पीएमपीच्या स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये डॉ. श्रीकर परदेशी यांच्याकडे पीएमपीचा कार्यभार स्वीकारण्यात आला होता. परदेशी यांच्या बदलीनंतर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांच्याकडे कार्यभार सोपाविण्यात आला आहे. बकोरीया यांच्यावरकडे प्रभारी कार्यभार देण्यापेक्षा पुर्ण वेळ अधिकारी नेमावा, अशी मागणी सजक नागरी मंच, पीएमपी प्रवासी मंचतर्फे करण्यात आली आहे.

# आपलं व्यासपीठ

## ड्रेनेज लाईन दुरुस्ती करा

नवी विडी कामगार वसाहत या ठिकाणी ड्रेनेज लाईन फुटल्याने तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ही ड्रेनेज लाईन त्वरीत दुरुस्ती करावी.

नवी विडी कामगार वसाहतीत गेल्या १५ वषार्पासून अनेक नागरिक स्थायिक झाले आहेत. या भागातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी पालिकेच्या वतीने लाखो रुपये खर्च करून परिसरात ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. मात्र गेल्या अनेक दिवसापासून ड्रेनेज लाईनमध्ये कचरा अडकल्याने सांडपाण्याचा प्रवाह पुढे जात नसल्याने ते सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना दुगंर्धीला सामोरे जाण्याची वेळ येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, याबाबत परिसरातील नागरिकांनी वारंवार आरोग्य व ड्रेनेज लाईन विभागाकडे तक्रार केली होती. मात्र, महापालिकेतील अधिका-यांनी नागरिकांच्या या गंभीर समस्येकडे गांर्भीयाने पाहावे.

**सचिन सातपुते**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक ‘पुण्य नगरी’ बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

# शिवाजीनगर परिसरात अतिक्रमणाचा हातोडा

**। पुणे : प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाच्या क्रमांक सहाच्या वतीने शिवाजीनगर परिसरातील २७ मिळकतींवर कारवाई करून सुमारे ६४१२ चौ.फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले. यापुढेही अतिक्रमणाचा हातोडा जोरदारपणे सुरू राहणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

मिळकतीच्या पुढील व लगतच्या भागात तसेच उर्वरीत मोकळ्या जागेत विनापरवाना शेड व ॲगल्सच्या सहाय्याने अनधिकृत बांधकाम,पार्टीशन, ओनिंग शेडवर कारवाई करण्यात आली.

कारवाई अंतर्गत ईश्वर मिनी मार्केट यांचे ३०० चौ.फूट, कमल फास्ट फुडचे ३०० चौ.फूट, याशिवाय एफसी रोडवरील पूजा कॉपिअर्स यांचे ४५ चौ.फूट, साई टी सेंटरचे ६० चौ.फूट या प्रमुख मिळकतींवर कारवाई करण्यात आली.

**नेपाळमध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपामुळे माऊंट एव्हरेस्ट परिसरात मृत्युमुखी पडलेल्या गिर्यारोहकांची संख्या २२ वर पोचली आहे, तर ६० जण जखमी झाले आहेत. भूकंपामुळे येथे मोठ्या प्रमाणात हिमकडेही कोसळले आहेत. बेस कॅम्पवर १७ गिर्यारोहक मृत्युमुखी पडले असून बेस कॅम्पपासून कमी उंचीवर असणाऱ्या इतर ठिकाणी पाच जणांनी आपला जीव गमावला आहे. याच पार्श्वभूमिवर गिर्यारोहकांना काय काळजी घ्यावी, याबाबत तरुणांच्या या प्रतिक्रिया...**




### चांगल्या प्रतीचे साहित्य असावेत



गिर्यारोहकासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येत असतो. त्यामुळे काही वेळा ते वापरात असलेल्या वस्तूंच्या दर्जाच्या बाबतीत तडजोड करण्यात येते. हा बाब त्यांच्या जीवावर येवू शकते. नैसर्गिक संकटात अशा वस्तू त्यांना दगा देवू शकता. त्यामुळे ते साहित्य चांगल्याच प्रतीचे असावे. सर्वात आधी भूकंपग्रस्तांनाही मदत करणे गरजेचे आहे. मदतीसाठी उद्या आम्ही महापालिकेत प्रस्ताव मांडणार आहोत. देशातून सर्वस्तरांतून त्यांना मदत करणे गरजेचे आहे.

**धनंजय जाधव (नगरसेवक)**

### गिर्यारोहकांचा विमा असावा



गिर्यारोहकासारखी साहसी खेळ वर्षभर सुरू असतो. त्यामुळे गिर्यारोहकांसाठी आपत्तकालीन पथक असलेच पाहिजे. तसेच त्यात नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती या स्वतः गिर्यारोहक असावेत. त्यामुळे संकट कशाप्रकारे काम करायचे याची माहिती त्यांना असेल. विमान अपघातमध्ये त्याचे अवशेष शोध हे मोठे अवघड काम असते. त्यामुळे शोध कामसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. गिर्यारोहकांचा विमाही उतरविण्यात यावा. त्यामुळे त्यांच्यात सुरक्षेची भावना राहिल.

**विक्रांत निकम**

### प्रत्येकाला जीपीआरएस असावे



गिर्यारोहण सुरू झाल्यानंतर अशी नैसर्गिक आपत्ती ओढावल्यास परत फिरणे अवघड असते. त्यामुळे गिर्यारोहकांनी चढाईला जाण्यापूर्वीच पूर्वतयारी असणे आवश्यक आहे. सर्वसाधारण तपासण्या तर गिर्यारोहक करीतच असतात. मात्र, भूकंपजन्य स्थितीत काय करता येईल, याचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. तसेच मोहिमेवर जाणाऱ्या प्रत्येकाला जीपीआरएस तंत्र बसविण्यात आले पाहिजे. त्यामुळे सहजसहजी त्यांचा शोध घेता येईल.

**अभिजीत पाटील**